Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 718 – 722
DOI: 10.5281/zenodo.10279356

Original Research Article

# स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचा सहभाग : विशेष संदर्भ गांधीयुग

प्रा. डॉ. प्रमोद चव्हाण

सहयोगी प्राध्यापक, जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर, महाराष्ट्र

*Corresponding author E-mail*: chavanpramod75@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

सन 1920 ते 1947 पर्यंत भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे नेतृत्व मोहनदास करमचंद गांधी यांच्याकडे राहिले. या मुळे या कालावधीला गांधीयुग असे संबोधले जाते. आपल्या बहुगुणी व्यक्तिमत्त्वाची छाप गांधीजींनी भारताचाच नव्हे तर जगाच्या इतिहासावर उमटवली. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य लढा आणि महात्मा गांधी या दोन बाबी अभिन्न आहेत, एकाला वगळून दुसराचा विचार शक्यच नाही. महात्मा गांधींशिवाय स्वातंत्र्यलढ्याचा अभ्यास करणे जसे व्यर्थ आहे. महात्मा गांधीनी केवळ भारतीय स्वातंत्र्य लढ्यावरच नव्हे तर संपूर्ण जगाच्या इतिहासावर सत्य, अहिंसा असहकार व सत्याग्रहाच्या विचारांचा प्रभाव कायम ठेवला आहे. सन 1885 मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना झाली.(1) राष्ट्रीय सभेच्या सुरुवातीचा कालखंड हा मवाळांचा कालखंड म्हणून ओळखला जातो. परंतु या कालखंडामध्ये स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रियांचा सहभाग नगण्य होता. रमाबाई रानडेआधी बोटावर मोजण्याइतक्या महिलांचा महिलांचा अपवाद सोडला तर 1920 पर्यंत सर्वसामान्य स्त्रीया. राष्ट्रीय चळवळीत सहभागी होताना दिसत नाहीत. 1920 नंतर राष्ट्रीय लढ्याचे नेतृत्व गांधीजींकडे आले. (2) त्यानंतर गांधीजींनी स्त्रीशक्तीचा स्वातंत्र्य लढ्यासाठी उपयोग करून घेण्याचे ठरवले. कारण या स्वातंत्र्यलढ्यासाठी आवश्यक असणारी सहनशक्ती स्त्रीयांमधे मोठ्या प्रमाणात असते, असे गांधी मानत. म्हणूनच स्वातंत्र्यलढ्यामध्ये स्त्रीयांना मोठ्या प्रमाणात त्यांनी सहभागी करून घेतले. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, किंवा भारत छोडो आंदोलन असो अशा विविध चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग लक्षणीय राहिला. त्यामुळे या विविध चळवळींचा अभ्यास करणे प्रस्तुत शोध निबंधाचा हेतू नसून, केवळ त्यातील स्त्रियांचा सहभाग अभ्यासणे हेच मर्यादित क्षेत्र आहे.

**कस्तुरबा गांधी:** कस्तुरबा गांधी या केवळ महात्मा गांधींच्या पत्नी म्हणूनच नव्हे तर स्वातंत्र्यसंग्रामात महत्त्वपूर्ण योगदान देणारी महिला म्हणूनही कस्तुरबा यांचे कार्य इतिहासात महत्त्वपूर्ण मानले जाते. परंतु दुर्देवाने त्यांच्या

योगदानाची इतिहासात फारशी दखल घेतली गेली नाही. कस्तुरबा गांधी यांचा जन्म 11 एप्रिल 1869 रोजी झाला. 14 व्या वर्षी त्यांचा विवाह मोहनदास करमचंद गांधी यांच्याशी झाला. (3) महात्मा गांधीजींच्या प्रत्येक चळवळीत त्यानी मन पूर्वक सहकार्य केले. किंबहुना सत्याग्रह सारख्या कार्यक्रमाची प्रेरणा गांधीजीनी टॉलस्टाय आणि कस्तुरबा यांच्यापासूनच घेतली. पतीच्या इच्छेप्रमाणे त्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची जडण घडण करून घेतली. कोणतीही कुरकुर न करता त्यांनी आश्रम जीवन हसत हसत स्वीकारले. मात्र स्वतःला पूर्ण समजल्याशिवाय आणि योग्य वाटल्याशिवाय त्यांनी गांधीजींची कोणतीही योजना स्वीकारली नाही. बर-याचदा आपली योजना समजावून सांगण्यासाठी व कस्तूरबाचे मन वळविण्यासाठी गांधीजींना कष्ट करावे लागले.

कस्तुरबा यांच्या सामाजिक जीवनाला 1897 पासूनच प्रारंभ झाला होता. जेव्हा गांधीजी अफ्रिकेत सत्याग्रह करत होते तेव्हा त्यामध्ये कस्तुरबानी सहभाग घेतला होता. परिणामी पती सोबत त्यांनाही कैद भोगावी लागली. सन 1915 मध्ये आपला पतीसमवेत त्या भारतात परतल्या. त्यानंतर गांधीजींनी चंपारण्य सत्याग्रह हाती घेतला. त्यामध्ये कस्तुरबानी आपले मोलाचे योगदान दिले. गावातील स्त्रियांना स्वातंत्र्य आंदोलनात येण्यासाठी खूप प्रयत्न केले. स्वातंत्र्यआंदोलनात गांधीजींना तुरुंगवास झाला. तेव्हा कस्तुरबानी अहिंसक मार्गाने स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व केले. राणी.1930 ते 34 या कालावधीत त्यानी दारूबंदी आणि परकीय कपड्याच्या दुकानासमोर सत्याग्रह केल्यामुळे त्यांना तुरुंगात जावे लागले.गांधीजींच्या ब्रह्मचर्यव्रत पालनास कस्तुरबानी मान्यता दिली होती.(4) 9 ऑगस्ट 1942 रोजी बिर्ला हाऊसमध्ये गांधीजींना जेव्हा अटक केली तेव्हा होणा-या सभेमध्ये कस्तुरबांनी मार्गदर्शन केले. परंतु लागलीच त्यांनाही अटक करण्यात आली. आणि मुंबईच्या आर्थर रोड जेलमध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर दोन दिवसांनी गांधीजींना ठेवलेल्या आगाखान पॅलेस येथे त्यांची रवानगी केली. फेब्रुवारी 1943 मध्ये गांधीजीनी 21 दिवसाच्या उपोषणाला बसले असताना. कस्तुरबा गांधीनी दिवस रात्र त्यांची सेवा सुश्रुषा केली. स्वतःच्या जिवाची पर्वा न करता त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत म्हणजेच 22 फेब्रुवारी 1944 पर्यंत त्यानी पतीची सेवा केली.(5)

**मणीबेन नानावटी:** गुजरातमध्ये. देरोल तेथें 28 फेब्रुवारी 1905 रोजी मणीबेन यांचा जन्म झाला. वयाच्या 17 व्या वर्षी चंदुलाल बालाभाई नानावटी यांच्याशी त्यांचा विवाह झाला. चंदुलाल नानावटी गांधीजींच्या विचाराने प्रभावित झाले असल्यामुळे पती पत्नीने स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली. आपल्या राहत्या घरातील तळमजला स्वयंसेवकाच्या वास्तव्यासाठी दिला तेथूनच खादीचा प्रचार, दारूबंदी, ग्रामोद्धार असे कार्यक्रम चालू लागले. स्वातंत्र लढ्याबाबत जनतेमध्ये जागृती निर्माण करणे, सूतकताई, खादीचा प्रचार अशा विविध कामांमध्ये मणीबेन यांनी पुढाकार घेतला. सर्व जातीतील आणि वर्गातील स्त्रीयांना सोबत घेऊन त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात आपले योगदान दिले. दारूच्या दुकानांपुढे निदर्शने. खजुराच्या झाडांच्या मालकांना खजुरापासून ताडी बनवण्या बनवण्यास परावृत्त करणे, सूतकताईचे वर्ग घेणे इत्यादि कार्य मोठ्या उत्साहाने त्या करत असत. त्यांच्या स्वातंत्र्य आंदोलनातील सहभागामुळे त्यांना तुरुंगात टाकण्यात आले.(6) तुरुंगामध्ये असतानाच आपल्याला दिवस गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. आणि तुरुंगातून सुटका होताच केवळ 10 दिवसातच त्यांना कन्यारत्न जन्मास आले. गांधीजी गोलमेज परिषदेहून परतल्यानंतर स्वातंत्र्य चळवळीत पुन्हा उत्साह निर्माण झाला. त्यावेळी अनेक महिलाना तुरुंगवास भोगावा लागला त्यामध्ये मणीबेन यांचा समावेश होता. त्यानंतर त्यांनी खादी ग्रामोद्योग भंडार सुरू करत स्वातंत्र्य चळवळीतील विधायक कार्यावर लक्ष केंद्रित केले. आशा या मणीबेनचा 5 एप्रिल 2000 रोजी मृत्यू झाला.

**सरोजिनी नायडू :** सरोजिनी नायडू यांचा जन्म 13 फेब्रुवारी 1869 रोजी हैदराबाद येथे झाला.(7) त्यांच्या वडिलांचे नाव अघोरनाथ चटोपाध्याय तर आईचे नाव वरदासुंदरी देवी असे होते. वयाच्या 12 व्या वर्षी त्या मॅट्रिक पास झाल्या. 1898 पर्यंत किंग्ज कॉलेज आणि त्यानंतर केंब्रिजच्या. गरटन कॉलेजमध्ये शिक्षण घेत होत्या. याच कालावधीत यांच्यातील कवयत्री प्रगल्भ झाली. त्यांनी बुलबुल-ए-हिंद म्हणून त्या जगप्रसिद्ध झाल्या. 1898 मध्ये डॉ. गोविंदराजुलू यांच्या सोबत त्यंचा विवाह झाला. तत्कालीन राजकीय नेते गोपाळ कृष्ण गोखले, रविंद्रनाथ टागोर. बॅरिस्टर जीना, महात्मा गांधी, एनी बेजंट, सी पी. रामास्वामी, पंडित नेहरू, यांच्याशी त्यांचा सखोल परिचय होता. या सर्वांचा सरोजिनी नायडू यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडला होता. त्यामुळेच त्या एक महत्त्वाच्या राजकीय नेत्या म्हणून संपूर्ण देशात परिचित झाल्या. 1907 मध्ये बंगालच्या फाळणीविरोधी कलकत्ता येथे जी सभा झाली त्यात त्यांचा सहभाग होता. हैद्राबाद येथील प्लेगच्या साथीमध्ये त्यांनी जे मोलाचे कार्य केले त्याबद्दल सरकारने त्यांना कैसर-ए-हिंद या पदवीने सन्मानित केले.(8) समाजसेवेच्या प्रारंभिक काळात त्यांच्यावर गोपाळ कृष्ण गोखले यांचा प्रभाव होता. सरोजिनी नायडू यांनी ॲनी बेझंट आणि सी. पी. रामस्वामी अय्यर यांच्यासह देशभर युवा कल्याण, स्त्री-उद्धार, राष्ट्रवाद, कामगारांची स्थिती यासारख्या विषयावर जनजागृती केली. तसेच खिलाफत चळवळ, रौलेट ऍक्ट विरोधी चळवळीतही त्यांनी सहभाग घेतला. होमरूल चळवळीमध्ये कार्य करत असताना त्या लिगच्या प्रतिनिधी म्हणून इंग्लंडला गेल्या.(9) इंग्लंड मध्ये जाऊन तेथें स्त्रियांच्या हक्कांसंबंधी जागृती केली. जालियानवाला बाग हत्याकांडाच्या निषेधार्थ कैसर-ए-हिंद ही पदवी सरकारला परत केली. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले.. गांधीजी ने जेव्हा सविनय कायदेभंगाची चळवळ हाती घेतली तेव्हा सरोजनी नायडू या गांधीजींच्या सर्वात विश्वासू सेनापती बनल्या. 1942 च्या भारत छोडोआंदोलनात सरोजिनी नायडू नेटाने सहभागी झाल्या. त्यावेळी त्यांना कारावासही भोगावा लागला. 1947 साली भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र या स्वातंत्र्याला फाळणीचा शाप लागला. पुढे स्वतंत्र भारतामध्ये त्या संयुक्त प्रांताच्या राज्यपालपदी त्यांची नेमणूक करण्यात आली. वयाच्या 70 व्या वर्ष म्हणजे 1949 मध्ये त्यांचे निधन झाले.

**कमला नेहरू:** नेहरू परिवारात लहान थोर मंडळीवर गांधीजींचा प्रचंड प्रभाव होता. त्यामुळेच गांधींजिच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य चळवळीमध्ये संपूर्ण कुटुंब सहभागी झाले होते. कमला नेहरू या पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पत्नी होय. (10) पतीच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात सहभाग घेतला. परदेशी मालावर बहिष्कार टाकून स्वदेशीचा स्वीकार केला. अत्यंत सुस्वरूप व नाजूक कायेच्या या स्त्रीने देशभक्तीपायी खादीच्या जाड्या भरड्या साड्या परिधान करणे पसंत केले. स्वातंत्र्य चळवळीतील त्यांच्या सहभागामुळे 1931 मध्ये त्यांना तुरुंगवास सोसावा लागला.

**मृदुला साराभाई:** मृदुला साराभाई यांचा जन्म 6 मे 1911 मध्ये. झाला. त्यांच्याही कुटुंबावर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडला होता. बालवयापासूनच मृदुलाबेनने खादीचा स्वीकार केला होता. अखिल भारतीय चरखा संघाच्या बबालविभागच्या त्या सदस्य होत्या. सन. 1929 मध्ये त्या युवक संघाच्या शीर्ष नेत्या होत्या. मृदुलाबेनने गुजरात विद्यापीठात शिकत असताना. 1930 साली गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. दांडी येथे मिठाचा कायदा मोडून लढ्याची सुरुवात होणार होती. या लढ्यात परदेशी कपडय़ांची दुकाने, दारुची दुकाने. यापुढे निदर्शने करण्याची जबाबदारी त्यांनी स्त्रियांवर सोपविली. यामध्ये मृदुलाबेन सहभागी झाल्या. परिणामी त्यांना अटक

करण्यात आले. अहमदाबाद मधील सरकारी शाळा व आर सी स्कूल येथे राष्ट्रीय तिरंगा ध्वज फडकविण्यासाठी विद्यार्थी व तरुणांचे एक पथक त्यांनी संघटित केले. 1942 च्या चलेजाव आंदोलनातही त्या सहभागी झाल्यामुळे त्यांना कैद करून दीड वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली. 1940 मध्ये गांधीजींच्या शांतीसेनेत सहभागी होऊन बिहारमध्ये. शांतिसैनिक म्हणून काम केले. (11) त्यांनी गांधीजींचे चिटणीस म्हणूनही काम पाहिले. त्यानी आपले अनुभव 'गांधी इन बिहार 1946-47' या नावाने शब्दबद्ध केले. 1947 मध्ये फाळणीच्या वेळी निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी मदत करण्याचे काम त्यांच्यावर सोपविण्यात आले होते ते त्यांनी चोखपणे बजावले.

**श्रीमती कमलाबेन पटेल:** कमलाबेन पटेल यांचा जन्म जानेवारी 1912 रोजी झाला. **कमलाबेन** यांच्या कुटुंबावर स्वातंत्र लढ्याचा खूप प्रभाव पडला होता. म्हणूनच त्यांच्या वडिलांनी परदेशी शिक्षण सोडून परदेशी कपडे यावरही बहिष्कार टाकला होता. त्याचा प्रभाव त्यांच्या मुलीवर म्हणजे कमलाबेन यांच्यावर पडला. 1925 मध्ये वडिलांबरोबर त्या साबरमती आश्रमात राहावयास आल्या. तेथें बापू आणि कस्तुरबा हेच त्यांचे पालक बनले. वयाच्या 18 व्या वर्षी दोन मुली असलेल्या एका विधुराशी त्यांचा विवाह झाला. मात्र अवघ्या 10 महिन्यामध्येच त्यांना वैधव्य आले. कमला बेनने आयुष्यभर गांधीजींच्या प्रत्येक लढ्यात सहभाग घेऊन मुक्तपणे सेवा केली. चले जाव चळवळ आणि भूमिगत कार्याशी संबंधित कामात त्यांनी बहुमोल मदत केली.(12)

**अवंतिकाबाई गोखले:** 1930 मध्ये महात्मा गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. 6 एप्रिल ला मिठाचा कायदा तोडून त्यांनी सत्याग्रह सुरू केला. अवंतिकाबाई त्या लढ्यात अग्रभागी होत्या. परदेशी कपडय़ांच्या दुकानांसमोर निदर्शने करणे प्रभात फे-या यामध्ये त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. पोलिसाने मारहाण केलेल्या रुग्णांची सेवा करण्याचे काम त्यानी केले. प्रदेश काँग्रेस समिती अवैध ठरविल्यामुळे देशभर सत्याग्रह सुरु झाले. त्यातील सत्याग्रहीच्या 13 व्या तुकडीचे नेतृत्व अवंतिकाबाईंकडे होते. ब्रिटिशाचा आदेश झुगारून त्यांनी आझाद मैदानावर ध्वजारोहण केले.(13) त्यामुळे त्यांना अटक केली आणि सहा महिन्याची कैद व ₹400 दंड अशी शिक्षा झाली.

**श्रीमती रामेश्वरी नेहरू:** मोतीलाल नेहरूंचे पुत्तने ब्रिजलाल नेहरू यांच्या त्या पत्नी आहेत. पंजाबमधील राज वंशात जन्मलेल्या या नाजूक आणि सुंदर स्त्रीने स्वतःचे आयुष्य स्वातंत्र्यासाठी वाहिले. त्यांनी महिला समाज ही संस्था काढली. तसेच स्त्री दर्पण नावाचे एक मासिकही चालविले. 1934 पासुन त्या महात्मा गांधींच्याबरोबर काम करू लागल्या. प्रसिद्धीची राजवस्त्रे टाकून त्यांनी गांधीजींचे हरिजन सेवा हे व्रत स्वीकारले. 1942 च्या स्वातंत्र्य आंदोलनात पोलिसांची नजर चुकवित त्यांनी प्रेस चालविली व स्वतंत्रचे विचार घरोघरी पोहोचविले त्यामुळे त्यांना तुरुंगवास सोसावा लागला. तुरुंगातून सुटका झाल्यानंतर त्यांनी बंगालच्या भयाण दुष्काळात जनसेवेचे कार्य केले.

**उषा मेहता:** उषा मेहता या प्रसिद्ध गांधीवादी विचारवंत आहेत. 1942 च्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी भूमिगत मुंबई मध्ये रेडियो स्टेशन चालविले. दुस-या महायुद्धातील इंग्रजांचे होणारी पीछेहाट देशभर सुरू असलेल्या चळवळी व त्यांचे स्वरूप याविषयी त्या रेडिओवरून माहिती देत. रेडियो केंद्र सतत फिरते ठेवल्यामुळे पोलिसांना त्यांना पकडणे शक्य नव्हते. मात्र एका फितुराने घात केल्यामुळे त्यांना अटक झाली. स्वातंत्र्य चळवळीत या आणि इतर अनेक स्त्रियांनी गांधीजींच्या नेतृत्वाखाली सहभाग घेतला.(14)

**संदर्भग्रंथ सूची**

१. डॉ. श्रीनिवास सातभाई, आधुनिक भारताचा इतिहास, विद्या बुक्स, पब्लिशर्स, औरंगाबाद, 2016 पृष्ठ. 277
२. कित्ता पृष्ठ. 282
३. मोहनदास करमचंद गांधी, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, नवजीवनप्रकाशन मंदिर, अहमदाबाद 2012 पृष्ठ. 401
४. सुनीता बोर्डे, संतोष खडसे, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया, शुभम पब्लिकेशन्स, पुणे,2010, पृष्ठ. 282
५. कित्ता- पृष्ठ. 121
६. कित्ता- पृष्ठ. 122
७. डॉ. एस.एस. गाठाळ, भारतीय इतिहासातील स्त्रीया व स्त्री जीवन, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद 2013, पृष्ठ. 263
८. कित्ता- पृष्ठ. 263
९. सुनीता बोर्डे, संतोष खडसे, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया, शुभम पब्लिकेशन्स, पुणे, 2010,पृष्ठ. 124
१०. डॉ. एस.एस. गाठाळ, भारतीय इतिहासातील स्त्रीया व स्त्री जीवन, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद 2013, पृष्ठ. 271
११. कित्ता-पृष्ठ. 269
१२. सुनीता बोर्डे, संतोष खडसे, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया, शुभम पब्लिकेशन्स, पुणे, 2010, पृष्ठ.126
१३. डॉ. पद्मजा पाटील सो शोभना जाधव, भारतीय इतिहासातील स्त्रीया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2011.पृष्ठ. 252
१४. डॉ. एस.एस. गाठाळ, भारतीय इतिहासातील स्त्रीया व स्त्री जीवन, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद 2013, पृष्ठ. 263